# बहुअंगी कलाकार

– लेखक सचिन राजे


राज कपूर


कवी प्रदीप


आनंद बक्षी


रविंद्र जैन


भूपेंद्र


गुरु दत्त


'रंग बरसे' गाताना अमिताभ


मीना कुमारी



आर. डी. बर्मन


पं. हरिप्रसाद चौरसिया


बहुरूपी किशोरकुमार 'पडोसन' मध्ये सुनील दत्तबरोबर


पं. शिवकुमार शर्मा


उस्ताद विलायत खाँ


पं. रविशंकर


पं. रघुनाथ सेठ

# बहुअंगी कलावंत

क्रिकेटमध्ये बऱ्याच वेळा प्रश्न उठतो, की team च्या दृष्टीने अष्टपैलू खेळाडू श्रेष्ठ, की एकाच क्षेत्रात (गोलंदाजी, फलंदाजी किंवा क्षेत्ररक्षण) निपुण असलेला खेळाडू श्रेष्ठ. अनेक बाबतीत कौशल्य असलं की एका क्षेत्रातील वैशिष्ठ्य कमी तर होत नाहीं ना! संगीत क्षेत्रांत एका बाबतींत कौशल्य असलेल्यांपेक्षा ज्यांची विविध क्षेत्रांत निपुणता आहे ते मला ज्यास्त आदरणीय वाटतात. आपण एकापेक्षा अधिक काहीं करू शकतो ह्यांत इतर कलांची तर उपासना आहेच पण त्याखेरीज आपण आपल्या मूळ प्रतिभेची पण उंची वाढवीत असतो. माझ्या मते ही गोष्ट संगीत क्षेत्रांत जास्त शक्य आहे.

हिंदी चित्रपट सृष्टींत अशी कितीतरी उदाहरणे आहेत की ज्यांनी आपल्या मूळ कले खेरीज अनेकही क्षेत्रांत आपली चमक दाखवली. उदाहरणार्थ राज कपूर -- हे उत्तम अभिनेता तर होतेच, शिवाय असामान्य दिग्दर्शक, उत्कृष्ट कथाकार असून संगीतावर त्यांचं खूपच प्रभुत्व होतं. त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी ते स्वतः पडताळून पहायचे व बऱ्याच वेळा असेकाहीं बदल सुचवायचे की ते गाणं खूपच यशस्वी व्हायचं. राज कपूरचं पडद्यावर गाणं गाताना पाहाणं म्हणजे एक अपूर्वाईच होती. त्यांना तसं पाहताना 'संगीताची' खरी पहचान आहे असं वाटायचं. 'लागा चुनरीमे दाग' चा शेवटचा तराना जणूं त्यांनी

स्वतः गायला आहे असं वाटतं. कदाचित बऱ्याच जणांना माहीतही नसेल की राज कपूरने स्वतः एक गाणं गायलेलं आहे. "दिल की रानी" नावाच्या चित्रपटामध्ये "कहां गया चितचोर" हे गाणं त्यांनी स्वतःवर चित्रित केले आहे.

गाणं, हे कविता आणि संगीत, ह्यांच मिलन असल्याने संगीतकाराला आणि कवीला गाणं म्हणणं कदाचित सोपे जात असावं. अर्थात सगळ्यांनाच गाण्याची कला अवगत असते असं नाहीं. माझ्या ह्या लेखांत मी त्या अभिनेत्यांना, गीत रचनाकरांना, दिग्दर्शकांना प्रणाम करतो की ज्यांनी आपल्या मूळ प्रभुत्वाखेरीज आणखी काहीं कलाकृती सादर केली.

प्रदीप सारखा श्रेष्ठ कवी, ज्याने राष्ट्रभक्तीवर गाणी रचण्यांत कमाल केली, जसे 'ए मेरे वतनके लोगो', त्यानेच प्रसिद्ध गाणी गायलेली सुद्धा आहेत. जशी 'देख तेरे संसारकी हालत क्या हो गयी भगवान' आणि 'आओ बच्चो तुम्हे दिखाए झांकी हिंदुस्तान की'. गीतकार आनंद बक्षी ह्यांनी सुद्धा काही प्रसिद्ध गाणी गायली आहेत. जसें 'बागो में बहार आई', 'जगत मुसाफिर खाना' (बालिका बधू), आणि शिवाय चरस मध्ये 'के आजा तेरी याद आयी' ला आपला आवाज दिलेला आहे. रवींद्र जैन, जे प्रसिद्ध गीतकार आणि संगीतकार आहेत, ह्यांनी 'जाते हुये ये पलछिन' (अखियोंके झरोंकेसे) गायले आहे. शिवाय रामानंद सागर च्या 'रामायण' च title song देखील रवींद्र जैनचच आहे.

राज खोसला ह्यांनी 'सी आय डी', 'बम्बईका बाबू','काला पानी' इ. चित्रपटांचे दिग्दर्शक म्हणून प्रसिद्धी तर मिळवलीच पण प्रथम त्यांनी फिल्मी दुनियेंत गायक म्हणूनच प्रवेश केला. ते गुरुदत्तचे assistant म्हणून काम करू लागले. गुरुदत्त सुद्धा स्वतः अष्टपैलू कलाकार होते -- उत्तम अभिनेता, दिग्दर्शक, नृत्यपटु, व नृत्य दिग्दर्शक. आजच्या काळातील सर्वश्रेष्ठ अभिनेता, अमिताभ बच्चन, ने सुद्धा बरीच काहीं गाणी स्वतः गायलेली आहेत. एकेकाळची लोकप्रिय अभिनेत्री, मीना कुमारी, सुद्धा एक उत्तम कवयित्री होती आणि तिने स्वतःच्या सुंदर आणि भावनात्मक अशा कवितांचा संग्रह प्रसिद्ध केलेला आहे.

भूपिंदरचा 'मौसम' मधील 'दिल ढूंढता है' तसेच 'नाम घूम जयेगा' यातील सुंदर, सुरेल आवाज तर आपणास परिचित आहेच. पण त्या शिवाय तो उत्तम गिटार पण वाजवतो. अनेक गिटारप्रधान गाण्यामध्ये solo आणि accompaniment भूपिंदरने स्वतः वाजविले आहेत हे कदाचित फार थोड्याजणांना माहित असेल. उदा. एक ही ख्वाब कयी बार देखा है मैने (किनारा), ये पौधे, ये पत्ते, ये फूल, ये हवाये (एक बार फीर). तसेच चुरा लिया है तुमने (यांदो की बारात) आणि तुम जो मिल गये हो (हसते जखम) ह्या सारख्या लोकप्रिय गाण्यांना त्यांनीच गिटार वाजविले आहे.

भूपिंदर चे निकट साथी व महान संगीतकार, आऱ डी

बर्मन, ह्यांनी सुद्धा आपला आवाज बऱ्याच गीतांना दिलेला आहे व त्याचा कुठे गवगवा पण झालेला नाहीं. जसे 'फुलोंका तारोका सबका कहना है' (हरे रामा हरे कृष्णा) ह्यांत डॅडीच्या आवाजात म्हटलेलं, 'डॅडीका मम्मीका सबका कहना है' शिवाय 'बडे अच्छे लगते है (बालिका बधु) मधील हलकीशी ओळ 'ओ माझी रे जायिओ पियाके देस'. आर डी ह्यांचं शोले मधील 'मेहबूबा मेहबूबा' व शान मधील 'समंदर मे नहाके' आणि 'यम्मा यम्मा' हे तर आपणा सर्वांना माहीत आहेच.

एखादे वाद्य उत्तम वाजवू शकणारा चित्रपटातील गाणं रचूं शकेलच असं नाहीं. तरीपण प्रख्यात शिव-हरी, म्हणजेच असामान्य लौकिक मिळवलेले पं. शिवकुमार शर्मा व पं. हरीप्रसाद चौरासिया, ह्यांनी 'मेरे हातोंमे नौ नौ चुडिया है' आणि 'रंग बरसे' अशा तऱ्हेची लोकप्रिय गाणी रचलेली आहेत. उस्ताद विलायत खाँ यांनी 'कादंबरी' करता अप्रतिम संगीत तयार केलं. पण दुर्दैवाने तो चित्रपट फारसा चालला नाहीं, ही गोष्ट वेगळी. परंतु त्यातील 'अंबरकी एक पाख सुराही' जे अमृता प्रीतमने लिहिलं आहे आणि आशाताईनी ते अतिशय सुरेख गायलं आहे, हे गाणं माझं आवडतं आहे. पं.रवि शंकरनी 'मीरा' करता ठीक ठीक संगीत दिलेलं आहे पण 'अनुराधा' मध्ये 'हाय रे वो दिन क्यू ना आये' आणि 'कैसे दिन बीते कैसे बीती रतिया' मधील संगीत सर्वोत्कृष्ट आहे. पं.रघुनाथ सेठ नी देखील 'एक बार फिर' आणि इतर काही चित्रपटांना संगीत

दिलेलं आहे, जसे 'मंथन', 'कलयुग' इ.

माझ्या मते निरनिराळ्या क्षेत्रांत प्राविण्य मिळवणारी अग्रगण्य व्यक्ती कोणी असेल तर ती म्हणजे *किशोर कुमार.* ते स्वतः गायक,विनोदी अभिनेता, कवी, ज्यांनी दूर गगन की छॉंवमे मध्ये 'कोयी लौटा दे मुझे बीते हुए दिन' सारखे गीत रचलेलं आहे. ह्या खेरीज ते दिग्दर्शक व निर्माते देखील आहेत. थोडक्यात म्हणजे ह्या व्यक्तीमध्ये काय नाही आहे आणि त्यांनी जे काही केलय ते नुसते साधारण प्रतीच नाही तर एकमेव आणि उत्कृष्ट. अशा कलाकारास माझे शतशः प्रणाम.

सचिन राजे

अनुवाद- गोपाळ गरुड